# महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर

## शोध समितीतर्फे कुलगुरू पदासाठी अर्ज मागविण्यात येत आहे.

महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर हे राज्यस्तरीय व्यावसायिक विद्यापीठ असून त्यामध्ये पशुवैद्यक व पशुविज्ञान, दुग्धतंत्रज्ञान, मत्स्य विज्ञान व पशुवैद्यक व पशुविज्ञान निम्न शिक्षण विद्याशाखेचा समावेश आहे. विद्यापीठाची स्थापना सन २००० मध्ये झालेली आहे. विद्यापीठ स्थापनेपासून विद्यापीठाने दर्जेदार शिक्षण, संशोधन व प्रशिक्षण याद्वारे विविधांगी योगदान देऊन सामान्यपणे समाजाच्या व मुख्यत्वेकरून शेतक-यांच्या आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक उत्थानामध्ये योगदान दिलेले आहे. विद्यापीठाचे मुख्य ध्येय शिक्षण, संशोधन व विस्तार शिक्षण हे आहे. या विद्यापीठाच्या चार विद्याशाखा असून त्या अंतर्गत राज्यातील विविध भागात दहा घटक महाविद्यालये कार्यरत आहेत. हे विद्यापीठ राज्य शासन, भारतीय पशुवैद्यक परिषद (VCI), भारतीय कृषि अनुसंधान परिषद (ICAR), विद्यापीठ अनुदान आयोग (UGC), यांचे विविध अधिनियम व नियमानुसार चालविले जाते.

महाराष्ट्राचे माननीय राज्यपाल व या विद्यापीठाचे कुलपती यांनी कुलगुरू पदासाठी योग्य उमेदवारांची शिफारस करण्यासाठी पुढील त्रिसदस्यीय शोध समिती गठित केलेली आहे.

| | | |
|---|---|---|
| 1. | मा. न्यायाधीश श्री. बी. सुदर्शन रेड्डी,<br>निवृत्त न्यायाधीश, सर्वोच्च न्यायालय, भारत सरकार | अध्यक्ष |
| 2. | डॉ. त्रिलोचन महापात्र, सचिव, डेअर व<br>महानिदेशक, भा.कृ.अनु.प., नवी दिल्ली | सदस्य |
| 3. | श्री. विकास देशमुख,<br>सचिव (पदुम), कृषि, पशुसंवर्धन,<br>दुग्धव्यवसाय व मत्स्यव्यवसाय विकास विभाग,मंत्रालय, महाराष्ट्र | सदस्य |

उपरोक्त शोध समिती ख्यातनाम विद्यातज्ञ, शास्त्रज्ञ व प्रशासक जे की कुलगुरू पदाची आव्हानात्मक जबाबदारी स्वीकारण्यास तयार असतील व शासन आदेश दिनांक १९ ऑक्टोबर २०१० अन्वये विहित शैक्षणिक अर्हता व अनुभव धारण करीत असतील अशा उमेदवारांकडून अर्ज/नामनिर्देशन मागवित आहे. आवश्यक शैक्षणिक अर्हता व अनुभव, ऐच्छिक (ईष्ट) अनुभव आणि अपेक्षित कौशल्य व क्षमता, अर्जाचा विहित नमुना इत्यादी सर्व बाबी विद्यापीठाच्या संकेतस्थळ www.mafsu.in वर उपलब्ध आहे.

इच्छुक उमेदवारांनी त्यांच्या उमेदवारीचे दोन पृष्ठाचे समर्थन, विद्यापीठाबाबतच्या त्यांच्या दृष्टिकोनासंबंधी दोन पानी अहवाल व त्यांच्या कामकाजाविषयी परिचित असण-या तीन नामांकित व्यक्तिची नावे यासह विहित नमुन्यात अर्ज सादर करावे. तसेच संस्था सुद्धा योग्य उमेदवाराचे नामनिर्देशन करू शकतील.

शोध समितीने डॉ. पी. जी. पाटील, संचालक, केंद्रीय कापूस तंत्रज्ञान संशोधन संस्था यांची नोडल अधिकारी म्हणून नेमणूक केलेली आहे. इच्छुक उमेदवारांनी **दिनांक ०८ सप्टेंबर, २०१७ पूर्वी किंवा पर्यंत** उपरोक्त नोडल अधिकारी यांचेकडे खाली नमूद केलेल्या पत्त्यावर कार्यालयीन वेळेत अर्ज / नामनिर्देशने सादर करावीत. अर्ज सादर करतांना पाकिटावर ***"कुलगुरू, म.प.म.वि.वि., नागपूर पदाकरीता अर्ज"*** असे ठळक अक्षरात नमूद करावे.

**डॉ. पी.जी. पाटील,**
**संचालक, भा.कृ.अनु.प.-केंद्रीय कापूस तंत्रज्ञान संशोधन संस्था,**
**एडनवाला रोड, माटुंगा (पूर्व ), मुंबई – ४०० ०१९.**
**दूरध्वनी क्रमांक: ०२२-२४१४ ६००२ / २४१२ ७२७३ फॅक्स नंबर : ०२२-२४१५ ७२३९ ई-मेल : nomafsu@gmail.com**

अर्ज करावयाच्या अंतिम दिनांकानंतर प्राप्त होणा-या अर्जाचा विचार केला जाणार नाही.शोध समितीला आवश्यकता वाटल्यास निवडयोग्य उमेदवारांना त्यांचे बरोबर वैयक्तिक पातळीवर विचार विनिमय करण्यासाठी आमंत्रित करण्यात येईल.

शैक्षणिक प्रशासकांना पशुवैद्यक, दुग्धतंत्रज्ञान व मत्स्यविज्ञान क्षेत्रामध्ये शिक्षण, संशोधन व विस्तार कार्यात भारतातील एका प्रगत राज्यामध्ये नाविन्यपूर्ण योगदान देण्याची ही अप्रतिम संधी आहे.

**स्वा/-**
**अध्यक्ष शोध समिती**